अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# राजकीय गोतावळा की साहित्यिकांचा सोहळा

नेहमीच्या परंपरेप्रमाणे यंदाचे साहित्य संमेलनही वादापासून सुटले नाही. पुण्याजवळ सासवड येथे भरणाऱ्या साहित्य संमेलनाच्या वाटेवर अनेक काटे पेरले गेले आहेत. खरे तर या संमेलनामध्ये उपस्थित राहणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींची यादी पाहिली तर त्याला साहित्य संमेलन म्हणावे की, राजकीय अधिवेशन म्हणावे? असा प्रश्न निर्माण होतो. या संमेलनाला आणखी एक गालबोट लावण्याचा प्रयत्न संयोजकांनी केला. दक्षिणेतला चित्रपट हिरो असलेल्या रजनीकांतला बोलवून त्यांनी मनोरंजनामध्ये भर घातली. आपल्या 'रोबोट' चित्रपटामुळे गाजलेला रजनीकांत महाराष्ट्रातल्या साहित्यिकांचे प्रबोधन करण्याची शक्यताच नाही म्हणजेच संमेलनात उध्दव ठाकरे, राज ठाकरे यांचे नाव निमंत्रण पत्रिकेवर नसल्यामुळे वाद झाला तर अनेक साहित्यिकांनाही योग्य त्या पध्दतीने निमंत्रणे दिली गेली नसल्याने ते नाराज होते. अशा परिस्थितीत सासवडच्या या साहित्य संमेलनात फार काही महत्त्वाचे साहित्यिक खूप निर्णय घेतील, असे वाटत नाही. नेहमीप्रमाणे राजकारणाच्या मांदियाळीमध्ये साहित्याचे तीन-तेराच वाजणार आहेत. कारण जवळपास हे साहित्य संमेलन एका राजकीय पक्षाने पूर्णपणे पुरस्कृत केल्यासारखी परिस्थिती आहे. मग त्या पक्षाचे थोर थोर नेते तिथे हजेरी लावतात, प्रसिध्दीची हौस भागवून घेतात. आणि आपण कसे सभ्य राजकारणी आहोत असे दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. आम्हाला तर नेहमीच आश्चर्य वाटते की, साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारणाची भाऊगर्दी कशासाठी होते. संमेलनाचे संयोजकदेखील राजकारणाला मोडून संमेलनांच्या मूळ हेतूलाच धक्का लावीत असतात. संमेलन हे साहित्यविषयक चर्चा करण्यासाठी असले पाहिजे, तिथे नेत्यांची आणि अभिनेत्यांची काहीच गरज नाही. एकाही साहित्यिकाला राजकारणाच्या अधिवेशनामध्ये बोलावले जात नाही किंवा अभिनेत्यांच्या सोहळ्यांमध्येसुध्दा लेखकांना कोणी विचारत सुध्दा नाही. अशा परिस्थितीत नेत्यांनी आणि अभिनेत्यांनी गर्दी केलेले हे संमेलन केवळ एक उपचार म्हणूनच पार पाडले जाते असे म्हणावे लागते.

### राजकारणी हवेतच कशाला

महाराष्ट्रातल्या साहित्यिकांचे एकूणच लेखन व्यवहारामध्ये फार मोठे योगदान आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीला सभ्यतेचे कोंदण देण्याचे काम मराठी भाषेनेच केले. असे हे महाराष्ट्र नगरीचे सारस्वत कथा, कादंबऱ्या आणि महाराष्ट्राच्या सामाजिक जनजीवनाविषयी चर्चा करण्यासाठी एकत्र येऊ लागले, काय लिहिले जावे आणि वाचकांच्या बुध्दिला कशा प्रकारचे खाद्य दिले जावे, सामान्य वाचकांच्या प्रतिभेला अधिकाधिक सकस साहित्यातून त्यांची प्रगल्भता वाढवावी. त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जाणिवा वृध्दिंगत कराव्या, समाजामध्ये अनेक घटना प्रसंग घडत असतात. ज्याचा सामाजिक संवेदनेशी थेट संबंध येतो, ज्याकडे राजकीय किंवा सत्ताधारी वर्ग तितक्या संवेदनशीलतेने पाहत नाही. एवढेच नव्हे तर समाजातला पैशाने श्रीमंत असलेला वर्गदेखील सामान्यांच्या जीवनाविषयी बेफिकीर असतो. या सगळ्या साडपडसादाचे निरीक्षण नोंदविण्याचे काम कथा कादंबऱ्यांच्या माध्यमातून होत राहते. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींविषयी माणूस संवेदनशील राहतो हे काम साहित्य करते. समाजाचा सामाजिक धर्म जपण्याचे काम साहित्यिकांमधला लेखनधर्मी करीत असतो. तोच जर सत्ताधाऱ्यांच्या आणि पैसेवाल्यांच्या नादी लागला तर या लेखनधर्मीकडून त्याच्याच लेखनाला योग्य तो न्याय मिळू शकत नाही. आजच्या परिस्थितीमध्ये अशा संवेदनशील लेखनाची किंवा सामाजिक घटनांचे प्रतिबिंब पडणाऱ्या साहित्याची फार मोठी गरज आहे. सामान्य माणूस अशाच अपेक्षेने साहित्य संमेलनाला येत असतो. तिथे साहित्यिकांपेक्षाही नेते आणि अभिनेत्यांचे अवडंबर माजवणे अत्यंत अयोग्य ठरते. साधारणत: गेल्या २०-२५ वर्षांपासून साहित्य संमेलनाची गाडी घसरली ती अजून रूळांवर आलेली नाही. केवळ साहित्य संमेलनाचे खर्च भागविण्यासाठी राजकारण्यांनी हे संमेलन वेठीला धरण्यासारखेच दिसून येते. महाराष्ट्र हे साहित्यिक दृष्टीने प्रगल्भ राज्य मानले जाते. गेल्या १०० वर्षांची परंपरा असलेल्या साहित्य संमेलनाच्या उपक्रमांनी एक विशेष स्थान निर्माण केले. विचारांना निर्भिडपणे व्यक्त करण्याचे एक सार्वभौम व्यासपीठ म्हणून साहित्य संमेलनाला महत्त्व प्राप्त झाले होते. तिथे पारित होणारे ठराव काय मतं व्यक्त करतात याविषयी सत्ताधाऱ्यांमध्ये किंवा राजकारण्यांमध्ये उत्सुकता दिसून येत असे. अनेक वेळेला तर साहित्यिक मंडळी संमेलनातून आपला कसा समाचार घेतात याविषयीसुध्दा एक धाक निर्माण झाला होता. आता त्याच्या उलट चित्र दिसून येते. अवघे संमेलनच राजकारण्याचे मिंधे झाले असल्याचे दिसून येते. सासवडचे साहित्य संमेलन हे त्याला अपवाद राहिलेले नाही. अशा परिस्थितीत साध्या निमंत्रण पत्रिकेवरच्या नावावरून राजकीय सुंदोपसुंदी पहायला मिळाली. प्रसिध्दीचा हव्यास असलेली ही मंडळी साहित्य संमेलनाच्या दर्जाबाबतही थोडेही भान ठेवायला तयार नाहीत, हे यावरून दिसून येते.

### मान्यवर साहित्यिकांना बोलवा

सासवड या परिसराला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. त्याचे योग्य ते भान साहित्य संमेलनात ठेवले जाईल अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात ज्या कारणांसाठी साहित्य संमेलन होते तो उद्देश सफल होणे जास्त आवश्यक आहे. रजनीकांत किंवा राजकारणातले स्वयंघोषित राव आणि पंत यांना बोलावण्यापेक्षा सगळ्या भारतातल्या नावाजलेल्या किंवा त्यापैकी ज्ञानपीठ पुरस्कार मिळवलेल्या पाच सहा लेखकांना जरी या संमेलनात बोलवले तरी संमेलनाची उंची वाढू शकते. राजकारण्यांचा गोतावळा गोळा करण्यापेक्षा सरस्वतीच्या या दरबारामध्ये साहित्यिकांचा सोहळा होणे जास्त औचित्यपूर्ण ठरते. सासवडच्या या संमेलनात अजून तरी तशी नावे समोर आलेली दिसत नाहीत. वैचारिक आणि प्रतिभासंपन्नतेचा वारसा हे साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य राहिले पाहिजे. दुर्दैवाने काही वर्षांपासून या व्यासपीठावर राजकारणी येतात आणि ते साहित्यिकांना उपदेश करीत असतात ते थांबले पाहिजे.